# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१०८** **दिनांक - २२/०३/२०२४**

## परदेशी नागरीकांना रुम भाडयाने दिल्याची माहिती पोलीस ठाण्यास न दिल्याने ११ घर मालकांवरती तुळींज पोलीस ठाणेची कारवाई

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात, तुळींज पोलीस ठाणेच्या हद्दीत प्रगतीनगर व मोरेगांव भागात मोठया प्रमाणात परदेशी नायजेरीयन व इतर आफ्रिकन देशातील नागरिक घरे भाडे तत्वांवर घेवुन राहवयास आहेत. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणत्याही परदेशी नागरीकांना व्यवसायीक तत्वावर राहण्यास देणे, या बाबतची माहिती संबंधितांनी २४ तासाच्या आत स्थानिक पोलीसांना परकीय नागरीक त्यांच्याकडे राहण्याकरीता आल्याची सुचना देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याची तरतुद आहे.

त्या अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार यांनी मनाई आदेश सी.आर.पी.सी. १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये आदेश पारीत केले होते. सदर मनाई आदेशान्वये घरात भाडे तत्वावर हॉटेल, लॉजेस, गेस्ट हाऊस, क्लब इत्यादी ठिकाणी परदेशी नागरीक आल्यास त्यांची माहिती विहीत प्रपत्रामध्ये २४ तासाचे आत पोलीसांना देणे बंधनकारक आहे. मनाई आदेश पारीत केल्यानंतर त्याबाबत पोलीसांनी वर्तमानपत्रे, भित्ती पत्रके याव्दारे समाजात जागृती केली होती.

तरीही काही घरमालकांनी त्यांचेकडे नायजेरीयन व इतर आफ्रिकन देशातील नागरीक भाडेतत्वावर राहण्यास आलेबाबत त्याची माहिती पोलीस ठाणेस न दिल्याने तुळींज पोलीस ठाण्यास एकुण ११ घरमालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन घरमालकांना अटक करुन त्यांना मा.न्यायालया समक्ष हजर केले.

त्यामुळे सदर घर मालकांच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याने सदर घर मालक आरोपी कारावसाची शिक्षा व दंडास पात्र राहणार आहेत. त्यामुळे सर्व नागरीकांनी परदेशी नागरीक भाडेकरु ठेवतांना त्यांची माहीती पोलीस ठाणेस दयावी तसे न केल्यास त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करुन मा.न्यायालयामध्ये खटला पाठविण्यात येईल असे सर्व नागरिकांना पोलीसांकडुन आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी श्रीमती.पौर्णीमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री.उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.